# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांकः12.02.2025 वारःबुधवार

1. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग जगात सर्वाधिक ठेवण्यासाठी उपाययोजना करणार असल्याची केंद्रीय अर्थमंत्र्यांची लोकसभेत ग्वाही
2. दहावी- बारावीच्या परीक्षेत सामूहिक कॉपी होणाऱ्या केंद्राची मान्यता कायमस्वरुपी रद्द करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश
3. ज्येष्ठ साहित्यिक रा. रं. बोराडे यांचं निधन आणि
4. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राला सर्वसाधारण विजेतेपद

**<u>अर्थसंकल्प-सितरामन</u>**

2025-26च्या केंद्रीय अर्थसंकल्पांत देशाच्या विकासासाठी आवश्यक घटक आणि वित्तीय प्राथमिकता यांचा समतोल साधला असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल सांगितलं. लोकसभेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तर देताना त्या काल बोलत होत्या. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग जगात सर्वाधिक ठेवण्यासाठी केंद्र सरकार सर्व उपाययोजना करणार असल्याची ग्वाही सीतारामन यांनी दिली. सरकार, भांडवली खर्च आणि भांडवली मालमत्ता निर्माण करण्यासाठी 99 टक्के कर्ज घेत असल्याचं त्यांनी सांगितलं. अर्थमंत्र्यांच्या उत्तरानंतर लोकसभेचं कामकाज उद्या म्हणजे 13 फेब्रुवारीपर्यन्त तहकूब करण्यात आलं. दरम्यान शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही काल अर्थसंकल्पावरील चर्चेत सहभाग घेतला.

**<u>मंत्रिमंडळ निर्णय</u>**

पुणे जिल्ह्यातील जनाई- शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रुपांतर करण्याच्या कामाला या राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या कामासाठी 438 कोटी 47 लाख 87 हजार 483 रुपयांच्या खर्चालाही मान्यता देण्यात आली आहे. पुणे जिल्ह्यातील दौंड, बारामती आणि पुरंदर तालुक्यातील सिंचनासाठी जनाई शिरसाई उपसा सिंचन योजना महत्त्वाची आहे.

याचबरोबर, पालघर जिल्ह्यातल्या विक्रमगड तालुक्यातील देहरजी मध्यम पाटबंधारे प्रकल्पाच्या 2 हजार 599 कोटी 15 लाख रुपयांच्या सुधारित खर्चालाही तसंच महाराष्ट्र आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण नियम, 2019 मध्ये दुरूस्ती करण्यालाही कालच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

**<u>मुख्यमंत्री-सरस प्रदर्शन</u>**

राज्यभरातील बचतगटांना त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी हक्काचं व्यासपीठ उपलब्ध व्हावं, यासाठी टप्प्याटप्प्याने संपूर्ण राज्यात उमेद मॉल तयार करण्यात येणार असून, प्रायोगिक तत्त्वावर दहा जिल्ह्यात दहा मॉल तयार केले जातील अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत केली. बांद्रा-कुर्ला संकुलात महालक्ष्मी सरस विक्री आणि प्रदर्शनाचं उद्घाटन काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. राज्यात आगामी काळात, 1 कोटी लखपती दीदी करण्याचा संकल्प असून, मार्च महिन्यापर्यंत पंचवीस लाख लखपती दीदी करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली. हे प्रदर्शन 23 फेब्रुवारीपर्यन्त सुरू राहणार असून, कलाकुसरीच्या वस्तू, हातमागावरील कपडे, दागिने, खेळणी, खाद्यपदार्थ अशी 500 हून जास्त दालनं इथे आहेत.

**बोर्डपरीक्षा**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या परीक्षेला कालपासून सुरुवात झाली. राज्यभरातील 3 हजार 373 मुख्य केंद्रांवर परीक्षा होत आहे.

**मुख्यमंत्री-कॉपी**

दहावी आणि बारावीच्या परीक्षेत सामूहिक कॉपी करण्याचे प्रकार ज्या केंद्रावर उघडकीस येतील त्या केंद्राची मान्यता कायमस्वरूपी रद्द करण्याचे, तसंच जे शिक्षक आणि कर्मचारी कॉपी करण्यासाठी मदत करतील त्यांना बडतर्फ करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी यांच्याशी परीक्षेच्या तयारीबाबत आणि कार्यवाही करण्याबाबत संवाद साधला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि अन्य मंत्री यावेळी उपस्थित होते.

**इंटरनेट दिवस**

राज्याचा माहिती तंत्रज्ञान विभाग आणि राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्राच्या वतीने काल 'सुरक्षित इंटरनेट दिन' साजरा करण्यात आला. या निमित्ताने राज्यभर जनजागृती मोहीम राबवण्यात आली. इंटरनेटचा सुरक्षित आणि जबाबदारीने वापर करण्याबाबत जागरूकता वाढवणं हा या मोहिमेचा उद्देश आहे.

**हॅकेथॉन**

माहिती आणि तंत्रज्ञान विषयक विविध समस्यांवर उपाय सुचवण्यासाठी 'महा हॅकेथॉन चॅलेंज 1.0' या स्पर्धेचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल उद्घाटन करण्यात आलं. तंत्रज्ञान नवोन्मेषक, संशोधक, उद्योजक, स्टार्टअप यांच्यासाठी ही स्पर्धा असून, विविध समस्यांवर प्रभावी आणि स्वदेशी उपाय उपलब्ध व्हावेत या उद्देशाने स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

**शेती-कृत्रिम बुद्धिमत्ता-धाराशीव**

कृषि क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्याचा प्रयोग धाराशिव जिल्ह्यात करण्यात आला आहे. कळंब तालुक्यातील शेळका धानोरा इथल्या सयाजी ॲग्रो प्रोडूसर कंपनीने आयसीआयसीआय फाउंडेशनच्या सहाय्याने कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा शेतकऱ्यांना लाभ करून देण्यासाठी प्रयत्न केले. जिल्ह्यातील महादेव कांबळे यांच्या शेतात पहिल्यांदाच या तंत्रज्ञानाचा यशस्वी वापर केला जात आहे. ऐकुया याविषयीची अधिक माहिती......

**शेतात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केल्यामुळे त्यांना पिकांच्या वाढीसाठी जमिनीमध्ये असलेली आर्द्रता, हवामानाचा पिकावर होणारा परिणाम, त्यासाठी वेळोवेळी करावयाच्या औषध फवारण्या, वातावरणातील बदलामुळे पिकांवर होणारे परिणाम तसेच पाण्याचे व्यवस्थापन आणि पीक व्यवस्थापन करण्यास मदत होत आहे. यासाठी जमिनीमध्ये वाफे पद्धतीने लावलेल्या मिरच्यांच्या मुळाशी सेंसर लावून ते सेंसर कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या वापरासाठी उभारलेल्या टॉवर पर्यंत पोहोचतात, या टॉवरवर वातावरणातील बदल टिपणारी यंत्रणा तसेच सोलार पॅनल बसवण्यात आला आहे. यामुळे हा टॉवर 24 तास कार्यरत राहून वातावरणातील बदल आणि नोंदणी केलेल्या पिकाच्या अनुषंगाने घ्यावयाची काळजी, पाणी व्यवस्थापन तसंच नोंदणी केलेल्या पिकांवर पडणाऱ्या रोग किडींचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आणि पिकांच्या वाढीसाठी संबंधित शेतकऱ्याला त्याच्या मोबाईलवर संदेशाद्वारे अवगत केलं जातं. त्यानुसार शेतकरी पिकांना आवश्यक असलेले पाणी, कीटकनाशक तसेच अनुषंगिक मशागतीचे काम करून पिकांची जोपासना करण्यास आणि शेती उत्पादन वाढण्यास मदत होणार आहे. शेती उत्पादन वाढवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा केलेला हा वापर हा धाराशिव जिल्ह्यातील पहिलाच पथदर्शी प्रयोग असून इतर शेतकऱ्यांना हा मार्गदर्शक ठरणार आहे. देविदसा पाठक, आकाशवाणी वार्ताहर, धाराशिव.**

**चंद्रनमस्कार-सांगली**

सूर्यनमस्काराप्रमाणेच चंद्र नमस्कारदेखील एक महत्वाचा योगप्रकार आहे. सांगलीमध्ये नुकत्याच झालेल्या भव्य 'चंद्रनमस्कार' उपक्रमात सुमारे बाराशे महिलांनी सहभाग घेतला. 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड' तसंच 'एशिया बुक ऑफ रेकॉर्ड' मध्ये या उपक्रमाची नोंद झाली. हा उपक्रम राबावणाऱ्या अर्चना कुलकर्णी चंद्रनमस्काराविषयी अधिक माहिती देताना म्हणाल्या....

**सूर्यनमस्कारही एक सर्वांगीण सुंदर व्यायाम आहे आणि त्याच पद्धतीने चंद्र नमस्कारही एक सर्वांगीण सुंदर व्यायामच आहे जिथे प्रत्येक आपल्या शरीराचा अवयव स्ट्रेच होतो ऑक्सिजन आणि ब्लड सप्लाय मिळतो. सूर्यनमस्कार जसं तुमच्या शरीराची ऊर्जा वाढवतो प्रीझर्व्ह करायचं जे काम आहे ती एनर्जी ते चंद्र नमस्कार करतो असं मला वाटतं. चंद्राच्या प्रकाशामध्ये किंवा संध्याकाळच्या वेळेमध्ये सगळं आपलं दिवसभराचं काम झाल्यानंतर घालणं हे जास्त हितकारक आहे, चंद्र नमस्कार. याच्यात एकतर साइड बेंडींग्स आपण ज्याला म्हणतो ते जास्त आहेत आणि ही पण एक 20 आसनांची साखळी आहे स्ट्रेस कमी करणारे असे हे व्यायाम आहेत तुमचे शरीराचं जे पोस्चर आहे तो याच्यामुळे खूप चांगला सुधारतो. शरीर खूप लवचिक बनतं. खास करून मुलींसाठी हे व्यायाम खरं तर खूप जास्त उपयोगी आहेत. मुलांनाही आहेत. पण मुलींना आत्ता जे आपल्याला मासिक पाळीचे त्रास आपण ऐकतो या सगळ्यावर हे चंद्र नमस्कार म्हणजे वयात येणाऱ्या मुलींनी तर आवर्जून हे घालावेत अशी माझी म्हणजे विनंतीच आहे सगळ्यांना.**

**निधन-बोराडे**

ज्येष्ठ कथाकार, कादंबरीकार प्राचार्य रावसाहेब बोराडे यांचं काल छत्रपती संभाजीनगर इथं खाजगी रुग्णालयात वृद्धापकाळामुळे निधन झालं. ते 85 वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर काल छत्रपती संभाजीनगरमध्ये अन्त्यसंस्कार करण्यात आले. साहित्यीक वर्तुळात 'पाचोळा'कार म्हणून ओळख असणारे बोराडे यांनी आपल्या लिखाणातून ग्रामीण भागातील माणसं, त्यांची सुख-दुःख, राजकारण, अंधश्रद्धा वाचकांसमोर आणल्या. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, ग्रामीण साहित्य परिषदेचे ते अध्यक्ष होते. राज्य शासनाच्या 'उत्कृष्ट वाङमय निर्मिती' पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आलं होतं. गेल्याच आठवड्यात त्यांना राज्य शासनाचा 'विं. दा. करंदीकर जीवन गौरव पुरस्कार' जाहीर झाला होता.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी प्राचार्य बोराडे यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. बोराडे यांच्या निधनाने मराठी साहित्य क्षेत्रातील समर्पित सेवायात्री हरपल्याची भावना मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या शोकसंदेशात व्यक्त केली आहे.

**राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा**

उत्तराखंड मध्ये सुरू असलेल्या 38व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्रानं एकंदर 149 पदके जिंकत सर्वसाधारण विजेतेपद पटकावलं आहे. महाराष्ट्राने या स्पर्धेत 33 सुवर्ण, 48 रौप्य आणि 48 कास्य पदकं पटकावली आहेत. सैन्य क्रीडा दलाचा संघ 55 सुवर्णपदकं मिळवून पदकतालिकेत प्रथम क्रमांकावर आहे तर महाराष्ट्राचा संघ दुसऱ्या क्रमांकावर आहे.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.